**नियमित दिवाणी दावा क्र.१११/२०१९**

**निशाणी क्र.१२२ वरील आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा वादी क्र.१ यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे वारस अभिलेखावर घेवून त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

**वादी यांचे कथन की,**

२. सदरचा दावा हा वादीने निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला असून कामकाज चालू असताना वादी क्र.१ हे दिनांक २८.०३.२०२० रोजी मयत झालेले आहेत. वादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. वादी क्र. १ चा मृत्यू दाखला दाखल केलेला आहे. त्यांच्या मृत्यूपश्चात वारसांची नावे वादी म्हणून दाव्यात सामील करण्यासाठी आवश्यक असल्याने त्यांना दाव्यात समाविष्ठ करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी हरकत नोंदविले की, सदरचा अर्ज कायदेशीर नसून तो दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ प्रमाणे मुदतीत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या तर्फे सन्माननीय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादी क्र.१ चे वारसांना दाव्यात सामील न केल्यास त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. कारण सदरचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी आहे. वादी क्र.१ चे वारसांना सदर दाव्यात

सामील करण्याबाबतची दुरुस्ती न केल्यास त्यांचे मोठे नुकसान होवू शकते. तसेच सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाचे तत्वानुसार सदर दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद केलेप्रमाणे वादी यांनी वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी मुदतीत दुरुस्ती करावी.

३. तसेच वादी यांनी दुरुस्त दाव्याची प्रत विहीत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

MADHAVI RAJESH DHANORKAR

Digitally signed by MADHAVI RAJESH DHANORKAR
Date: 2022.04.19 11:18:13 +0530

(एम.आर.धानोरकर)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
माळशिरस.

दि.१८/०४/२०२२.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : S.M.Algundgi, Grade-II |
| (b) | Court | : Jt. Civil Court Sr. Divn., Malshiras. |
| (c) | Judgment signed by P.O. on | : 18.04.2022. |
| (d) | Judgment uploaded on | : 19.04.2022. |